# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. १४७/२०१४-१५

### फेरतपासणी व पुनर्मूल्यांकनाच्या आधारे तात्पुरता (Provisional) प्रवेश

विद्यापीठाच्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यास आवश्यक तेवढे गुण न मिळाल्यास अगर अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्यास गुण फेरतपासणी व पुनर्मूल्यांकनासाठी नियमानुसार अर्ज करण्याची सवलत दिलेली आहे. तसेच असा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना पुढील सत्रात अगर वर्षात तात्पुरता प्रवेश देण्यासंदर्भात परिपत्रक क्र. २३२/१९८१-८२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या अनुषंगाने परिपत्रक क्र. ३२८/१९९४-९५ अन्वयें संबंधित विद्यार्थ्यांकडून तात्पुरता प्रवेश देतेवेळी शुल्क आकारणीबाबत नियम विहीत केले आहेत. सदर परिपत्रकानुसार परिपत्रक क्र. २३२/१९८१-८२ मधील तरतुदींच्या अधीन राहून विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश देतेवेळी संबंधित विद्यार्थ्यांकडून ५०% शुल्क घेण्यात येत असून उर्वरित ५०% शुल्क हे प्रवेश कायम झाल्यानंतर घेण्यात येते.

मा. कुलगुरु यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार अभियांत्रिकी विद्याशाखेतील अभियांत्रिकी अभ्यासक्रमासंदर्भात वरील धोरणात बदल करण्यात येत असून, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासंदर्भात सदर परिपत्रक निर्गमित झाल्यापासून तात्पुरत्या प्रवेशाबाबत खालील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :

१. जे विद्यार्थी परीक्षेत अनुत्तीर्ण झाले आहेत अगर अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले आहेत आणि त्यांनी फेरतपासणी व पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला आहे, अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी त्यांना त्यांच्या विनंतीवरुन, त्याच अभ्यासक्रमाच्या पुढील सत्रात/वर्षात प्रवेश द्यावा.
२. हा प्रवेश पूर्णतः (Provisional) तात्पुरता राहील.
३. सदर प्रवेश विद्यार्थ्याच्या जबाबदारीवर राहील.
४. फेरतपासणी व पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यास प्रवेश कायम राहील. अन्यथा अनुत्तीर्ण झाल्यास प्रवेश रद्द समजण्यात येईल.
५. विद्यार्थ्यांना तात्पुरता (Provisional) प्रवेश देतेवेळी, संबंधित विद्यार्थ्याकडून फक्त १०% शुल्क आकारण्यात यावे. प्रवेश कायम झाल्यानंतर उर्वरित शुल्क घेण्यात यावे. प्रवेश कायम न झाल्यास सदरचे १०% शुल्क संबंधित विद्यार्थ्यास परत करण्यात यावे.
६. ही सवलत फक्त अभियांत्रिकी विद्याशाखेतील अभियांत्रिकी अभ्यासक्रमासच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पुरतीच लागू राहील.

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये यांना विनंती की, या परिपत्रकातील आशय सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा. क्र. परीक्षा/पनि/६५
दि. २२/२४.०७.२०१४

**प्रभारी परीक्षा नियंत्रक**